21 MAY 2025 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित 'पुढारी'कार पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. यावेळी व्यासपीठावर डावीकडून प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, खासदार शाहू महाराज, पुढारी माध्यम समूहाचे चेअरमन डॉ. योगेश जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. (छाया : मिलन मकानदार)

# भारताने पाकिस्तान-चीनचा बागुलबुवा फाडून टाकला

## डॉ. ग. गो. जाधव व्याख्यानमालेत देवळाणकर यांचे उद्गार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पहलगामचा हल्ला करण्याचे धाडस परकीय मदतीवर जगणाऱ्या पाकिस्तानात नाही. भारताला विकासाच्या मार्गाने पुढे जायचे आहे. भारत आता विकसित होत आहे. हे अनेक देशांना खुपत आहे. यामुळे पहलगामवरील हल्ला करण्याचे धाडस एकट्या पाकिस्तानात नाही. तो आंतरराष्ट्रीय कट असू शकतो, असे सांगत भारताने 'ऑपरेशन सिंदूर' राबवताना पाकिस्तानाला धडा शिकवलाच; पण चीनलाही ठोस संदेश दिला. अनेक देशांना उघडे पाडले. भारत हा पाकिस्तान-चीनचे काहीही करू शकत नाही, हा अनेक वर्षे सुरू असलेला बागुलबुवा फाडून टाकला, असे प्रतिपादन राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी मंगळवारी केले. भारताचा विकास होणे ही आता काळ्या दगडावरील पांढरी रेघ आहे. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होणार आहे. त्याला कोणीही अडवू शकत नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित 'पुढारी'कार पद्मश्री पान २ वर ▸

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 MAY 2025
पुढारी



**कोल्हापूर : पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र- कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. शिवाजी जाधव, जयप्रकाश पाटील, डॉ. सुमेधा साळुंखे आदी.**

# पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात दै. 'पुढारी'चे संस्थापक संपादक पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांना अभिवादन करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते डॉ. ग. गो. जाधव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, अथर्व यज्ञपवित, निकिता घुगे, अनुप जत्राटकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 MAY 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ अंतर्गत १७२ परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत २०२४-२५ उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर परीक्षा सुरू आहेत. आत्तापर्यंत झालेल्या परीक्षांपैकी १७२ विषयांचे निकाल जाहीर झाले आहेत. तर मंगळवारी बीए., बीएस्सी., डिप्लोमा इन सेरिकल्चर, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन सेरीकल्चर, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन रूरल डेव्हलपमेंट, एम. लिप. फार्मा डी. बी. आय. डी., बी आर्किटेक्चर, पीजी डिप्लोमा इन ह्युमन राईट ॲण्ड व्हॅल्युज इन एज्युकेशन अशा २८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा एकूण १७४ परीक्षा केंद्रावर सुरळीत पार पडल्या. ३२ हजार २५७ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. भरारी पथकाकडून सांगली ३, सातारा २ एकूण ५ गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीकडे झाली आहे. तरी विद्यार्थ्यांनी परीक्षा विद्यापीठ नियमानुसार घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
2 1 MAY 2025 तरुण भारत "शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर"

# पदवी प्रथम वर्ष प्रवेश सुरू

■ बीए, बीकॉम, बीएस्सीसह अन्य अभ्यासक्रमांचा समावेश .

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

बारावीचा निकाल जाहीर होवून विद्यार्थ्यांना मूळ गुणपत्रक आणि शाळा सोडल्याचा दाखला एकाच दिवशी मिळाला आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयात पदवी प्रथम वर्षाच्या प्रवेशाला सोमवारपासून प्रारंभ झाला आहे.

प्रत्येक महाविद्यालयाने आपआपल्या पध्दतीने प्रवेश प्रक्रिया राबवली आहे. त्यामुळे काही महाविद्यालयांची ऑनलाईन तर काही महाविद्यालयांची ऑफलाईन प्रवेश प्रक्रिया आहे. सोमवारी शहरातील अनेक महाविद्यालयात पदवी प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत २९९ महाविद्यालयातील पदवी प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सोमवारपासून सुरू झाली आहे. बीए, बीकॉम, बीएस्सी, बीबीए, बीसीएला, बीकॉम कॉम्प्युटर ॲप्लीकेशन अशा अनेक अभ्यासक्रमासह इतर अभ्यासक्रमांचाही समावेश आहे. प्रत्येक महाविद्यालयात प्रवेश क्षमता वेगवेगळी आहे. एका तुकडीत किमान ११२ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत असल्याने पारंपारिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी संख्येत दरवर्षी घट होत असल्याचे चित्र आहे. प्रत्येक महाविद्यालयांचे शैक्षणिक शुल्क वेगवेगळे आहे, याची विद्यार्थ्यांनी दखल घ्यावी, असे आवाहन शहरातील महाविद्यालयाकडून केले जात आहे.

### स्वायत्त महाविद्यालयाची स्वतंत्र प्रवेश प्रक्रिया

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत स्वायत्त महाविद्यालयांची स्वतंत्र प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार आहे. स्वायत्त महाविद्यालयांचा अभ्यासक्रमही स्वतंत्र असल्याने या अभ्यासक्रमाचे प्रवेश शुल्कही वेगवेगळे असणार आहे.